16_khozmasternews paper 17-01-2025 02:57 Page 1

खोज मास्टर न्यूज LIVE खोज हर खबर की

सायं दैनिक
# खोज मास्टर

RNI NO : MAHBIL/63416/2015

मुख्य संपादक - रमेश चव्हाण पाटील मो. ९६५७४५१५९६ कार्यकारी संपादक - विवेक धावटेकर मो.९८९०२५४५७७

बुलढाणा • अकोला • वाशिम • यवतमाळ • हिंगोली • परभणी • नांदेड • जालना • छ. संभाजीनगर • बीड • नाशिक • सांगली • कोल्हापूर • जळगाव खा. • नंदुरबार • पुणे • पिंपरी चिंचवड

thmant

WWW.KHOZMASTER.IN । वर्ष : ९ वे । अंक : २४९वा । महाराष्ट्र ।शुक्रवार दि १७-१-२०२५ । किंमत : २ रुपये । पृष्ठे : ४

## मी जरी निवडणुकीत पराभूत झालो असलो तरीसुद्धा माझ्या मायबाप जनतेच्या सेवेसाठी मी नेहमी कटिबद्ध राहीन :- माजी आमदार संजय रायमुलकर



**मेहकर :- ( तालुका प्रतिनिधी )** मेहकर तालुक्यातील वरवंड येथे ३० लाख रुपयांच्या विविध कामाच भूमिपूजन माजी आमदार संजय रायमुलकर साहेब यांच्या हस्ते १६ जानेवारी रोजी संपन्न झाले यावेळी रायमुलकर साहेब पुढे म्हणाले की मी जरी निवडणुकीत पराभूत झालो असलो तरीसुद्धा माझ्या मायबाप जनतेच्या सेवेसाठी व प्रत्येक गावच्या विकासासाठी मी नेहमी कटिबद्ध राहीन महाराष्ट्रामध्ये महायुतीचीच सरकार आहे पालकमंत्री आपलेच आहेत मंत्री सुद्धा आपलेच आहेत त्यामुळे मेहकर मतदारसंघात कुठेही विकास कमी पडणार नाही उलट यापेक्षाही जास्त कामे यापुढे मेहकर मतदार संघात होतील यावेळी वरवंड येथे स्मशानभूमी पेवर ब्लॉक १५ लाख रुपये मस्जिद जवळ ब्लॉक १५ लाख रुपये असे एकूण ३० लाख रुपये किमतीच्या कामाचे भूमिपूजन यावेळी माजी आमदार संजय रायमुलकर साहेब यांच्या हस्ते झाले तर अजूनही वरवंड गावच्या विकासासाठी निधी कुठेही कमी पडू देणार नाही मी आत्तापर्यंत कधीही लोकांना भूल थापा दिलेले नाहीत जो शब्द दिला तो १००% पाळला आहे मात्र काही लोकप्रतिनिधी मेहकर मतदार संघातील जनतेला भुलथापा देत आहेत आम्ही आणलेल्या कामाचेच ते भूमिपूजन करत आहेत सरकार आमच्या आहे व मागे सुद्धा आमचे सरकार होते त्यामुळे मी ही कामे मंत्रालयातून मंजूर करून घेतले आहेत त्यामुळे आमच्या कामाचे कोणीही भूमिपूजन करू नये असेही यावेळी रायमुलकर साहेब यांनी सांगितले गावातील शिवसैनिकांना आवाहन करताना रायमूलकर साहेब म्हणाले की आपण जी कामे मंजूर करून आणली आहेत त्या कामाचे कोणालाही भूमिपूजन करू देऊ नका आपल्या नावाचे त्या ठिकाणी बोर्ड लावा व ठेकेदाराकडून नियमानुसार चांगल्या दर्जाची कामे करून घ्यावीत जर ठेकेदार चांगले कामे करत नसतील तर त्याची तक्रार माझ्याकडे करा असेही रायमुलकर साहेब यांनी शिवसैनिकांना आवाहन केले आहे

## झेडपी, पंचायत समिती, महापालिकांच्या एप्रिलमध्ये निवडणुका!

**बुलढाणा :- ( जिल्हा प्रतिनिधी )** राज्यातील बहुचर्चित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एप्रिल महिन्यातच होणार असल्याचे स्पष्ट संकेत राज्य सरकारच्या वरिष्ठस्तरीय सूत्रांकडून प्राप्त झाले आहेत. त्यामुळे महापालिका व जिल्हा परिषद, पंचायत समित्यांची तयारी करणाऱ्या स्थानिक नेत्यांची प्रतीक्षा आता लवकरच संपुष्टात येणार आहे. यासंदर्भात ओबीसी आरक्षणासंदर्भातील एकत्रित सर्व याचिकांवरील सर्वोच्च न्यायालयातील महत्वपूर्ण सुनावणी दि.२२ जानेवारीरोजी होत असून, अंतिम सुनावणी व्हावी, यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलेले आहे. राजकीय पक्षांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी सुरू केली आहे. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणी-वरही सर्वांचे लक्ष आहे.काही दिवसांपूर्वी शिवसेना खासदार संजय राऊत यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवणार असल्याची घोषणा केली होती. त्यामुळे, महाविकास आघाडी राहणार की नाही, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाल्याचे पहायाला मिळाले आहे. दुसरीकडे, बुलढाणा जिल्ह्यात शेतकरी नेते रविकांत तुपकर हे महाआघाडी सोबत येतात, की महायुतीसोबत राहतात, की स्वतंत्र लढतात? यावरही बुलढाणा जिल्ह्यातील राजकीय गणिते अवलंबून आहे. तुपकर यांनी काहीही निर्णय घेतला तरी झेडपी व पंचायत समिती निवडणुकांत जिल्ह्यात तुपकर फॅक्टर चालणे क्रमप्राप्त मानले जात आहे. कारण, तुपकरांनी आधी लोकसभा व आता विधानसभा निवडणुकीतही आपली राजकीय ताकद दाखवून दिली आहे. सध्या राज्यभरात अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासकांची नेमणूक केली गे-लेली आहे. जे गेल्या दोन वर्षांपेक्षा जास्तकाळ कार्यरत आहेत. यावर स्थानिक नेत्यांनी नाराजी व्यक्त केली असून, निवडणुकांचा मार्ग लवकरच मोकळा होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. बुलढाणा




जिल्हा परिषदेसह जवळपास २६ जिल्हा परिषद आणि २८९ पंचायत समित्यांवर सध्या प्रशासक काम करत आहेत. तर २९ महानगरपालिका व २५७ नगरपालिकांवरदेखील प्रशासकराज आहे. त्यामुळे या निवडणुकांनंतर हे प्रशासकराज हटणार आहे. जिल्हा परिषद, महापालिका व पंचायत समित्यांच्या निवडणुकांचा एप्रिलमध्ये धुराळा उडणे निश्चित मानले जात असून, लवकरच राज्य निवडणूक आयुक्त यांच्या नावाची शिफारस होणार आहे. गेली अनेक दिवसांपासून हे पद रिक्त आहे. त्यामुळे, निवणुकांपूर्वी ह्या पदावर नियुक्ती करणे महत्त्वाचे आहे. विशेष म्हणजे, आजच ही शिफारस केली जाणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे, आता विधानसभा निवडणुकांच्या विजयी जल्लोषानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुकांचा विजयी गुलाल उधाळण्याची तयारी राजकीय पक्षांकडून सुरू होईल. सध्या आरक्षणाच्या मुद्द्यावरुन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा विषय सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. मात्र, याच महिन्यात याप्रकरणी सुनावणी होणार आहे. त्यातच, ही सुनावणी अंतिम व्हावी, यासाठी राज्य सरकारकडून प्रयत्न केले जातील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलेले आहे. साध-ारणतः एप्रिल महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होतील, असे वरिष्ठ अधिकारी सूत्राने स्पष्ट केले आहे.

## सत्यजित स्कूलचे स्नेहसंमेलन म्हणजे संस्काराचे माहेरघर:- आमदार सिद्धार्थ खरात



**मेहकर( एजाज खान)** मातोश्री एज्युकेशन सोसायटी मेहकर द्वारा संचालित सत्यजित इंटरनॅशनल इंग्लिश (उइडए) स्कूल मेहकर व सत्यजित ग्रुप ऑफ्फ कॉलेजेस,मेहकरच्या वार्षिक स्नेहसंमेलन झेप २०२५ चे उद्घाटन दिनांक १६ जानेवारी रोजी करण्यात आले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थाध्यक्ष श्याम उमाळकर कार्यक्रमाचे उद्घाटक मेहकर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात,तसेच दीप प्रज्वलन अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार साजीद खान पठाण तर प्रमुख अतिथी म्हणून संस्था सचिव भूषण मिनासे,राजू उमाळकर,श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुदेश लोढे, प्रकाश तायडे,मेहकर तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष देवानंद पवार,अकोला काँग्रेस शहराध्यक्ष प्रशांत वानखेडे,वानखेडे, शांतीलाल गुगलीया, मेहकर काँग्रेस शहराध्यक्ष पंकज हजारी,लोण-ारचे माजी नगराध्यक्ष साहेबराव पाटोळे, माजी नगरसेवक बादशहा खान,शेख समद भाई,उबाठाचे उपजिल्हाप्रमुख प्रा.आशिष रहाटे,उबाठाचे शहरप्रमुख किशोर गारोळे,उबाठा युवासेनेचे तालुकाप्रमुख विधिज्ञ आकाश घोडे,विधिज्ञ संदीप गवई, माजी सभापती सागर पाटील हे होते. कार्यक्रमाची सुरुवात संतश्रेष्ठ गजानन महाराज तसेच सरस्वती मातेच्या प्रतिमा पूजनाने व स्वागत गीताने झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्था सचिव भूषण मिनासे यांनी केले.आपल्या प्रास्ताविकात त्यांनी संस्थेच्या शैक्षणिक प्रगतीचे टप्पे विशद केले. आपल्या उद्घाटनवर भाषणामध्ये आमदार सिद्धार्थ खरात यांनी विद्यार्थ्यांना या स्पर्धात्मक युगात टिकण्याकरिता मेहनत केली पाहिजे. त्याकरिता इंग्लिश स्कूल योग्य व्यासपीठ असल्याचे सांगितले तसेच संस्थेच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.आमदार सजीद खान पठाण यांनी देखील आपल्या भाषणामध्ये सत्यजित या संस्थेची प्रगती उत्तरोत्तर वाढत जावी तसेच अशा प्रकारची संस्था मी यापूर्वी कधीही पाहिली नाही.असे गौरवोद्गार काढले. आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये संस्थाध्यक्ष श्याम उमाळकर यांनी विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने मातोश्री एज्युकेशन सोसायटी ही शैक्षणिक संस्था कशाप्रकारे कार्यरत आहे.संस्थेची भविष्यातील वाटचाल कशी काय राहील, याविषयी आपले मत मांडले; आणि वार्षिक स्नेहसंमेलनासाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष विलास चनखोरे,प्रकाश तायडे,व प्रा.आशिष रहाटे, वानखेडे यांची समायोचीत भाषणे झाली. या निमित्ताने संस्थेच्या सांस्कृतिक सभागृहामध्ये सलग तीन दिवस विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये स्वागत नृत्य, पोस्टर सादरीकरण, रांगोळी स्पर्धा, संगीत खुर्ची, लिंबू चमचा रस्सीखेच, फ्रॉग्रेस, खो खो, कबड्डी, गीत गायन अशा विविध गुणदर्शन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता प्राचार्य रवींद्र माळी, प्राचार्य डॉक्टर शिवशंकर म्हस्के, प्राचार्य सचिन पनाड व सर्व शिक्षकांनी सहकार्य केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानेश्वर खरात तर आभार प्रदर्शन प्राचार्य रवींद्र माळी यांनी केले. यावेळी मोठ्या संख्येने पालक वर्ग उपस्थित होता.

## कलावंत तितुका मेळवावा.. कला धर्म वाढवावा... प्रा. गजेंद्र गवई
## तांदूळवाडी येथे कलावंत जाणीव जागृती चेतना कार्यक्रमात प्रतिपादन..

**मेहकर:-(तालुका प्रतिनिधी)** महाराष्ट्रातील ग्रामीण भागात विविध लोककला सादर करून सांस्कृतिक वारसा जपणाऱ्या तमाम असंगठीत लोककारांनी कलावंत म्हणून आपली ओळख शासन दरबारी दखल घेऊन नोंद व्हावी यासाठी 'कलावंत तितुका मेळवावा..कला धर्म वाढवावा..'असे आवाहन लोककलावंत प्रबोधन परिषद,महाराष्ट्र राज्याचे राज्य समन्वयक तथा कोषाध्यक्ष प्रा.गजेंद्र गवई यांनी सिंदखेड राजा तालुक्यातील मौजे तांदुळवाडी येथे आयोजित स्थानिक कलावंत जाणीव जागृती.. चेतना कार्यक्रमात व्यक्त केले.लोककलावंत प्रबोधन परिषद,महाराष्ट्र राज्य या राज्यव्यापी कलावंत शिखर संघटनेच्या वतीने मौजे तांदुळवाडी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक, मारोती मंदिरासमोर स्थानीक लोककलावंत जाणीव जागृती चेतना कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तंटामुक्ती समिती चे माजी अध्यक्ष आत्माराम बुंधे होते तर प्रमुख मार्गदर्शक लोप्रपचे राज्य समन्वयक प्रा.गजेंद्र गवई,शाहीर राहुल जाधव,धनंजय गवई यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रमाता माँसाहेब जिजाऊ व छत्रपती संभाजी राजे यांच्या प्रतिमाचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे संयोजक शाहीर उत्तम जाधव यांनी प्रास्ताविक करुन स्थानिक लोककलावंत यांनी गावागावात एकसंघ होऊन संघटित झाले पाहिजे असे आवाहन करुन गाव तिथे ग्राम शाखा स्थापना करुन आपले कलावंत म्हणून अस्तित्व सिद्ध करावे असे मत व्यक्त केले. लोप्रप चे राज्य समन्वयक प्रा.गजेंद्र गवई यांनी राज्यस्तरीय असणाऱ्या लोककलावंत प्रबोधन



परिषद,म.रा.या संघटनेचे ध्येय,उद्दिष्टे,कार्य याची सविस्तर माहिती देऊन संपूर्ण महाराष्ट्रभर प्रत्येक गावातील स्थानिक सर्व लोककलावंत,गायक, वादक,नकलाकार,महिला पुरुष,युवक,युवती जे स्वतःला कलावंत म्हणून जगत आहेत त्या सर्वांनी संघटनेमध्ये रीतसर सभासदत्व स्वीकारुन आपल्या न्याय हक्काच्या संविधानिक लढ्यात सहभागी व्हावे असे विचार व्यक्त केले.. याप्रसंगी प्रकाश बुधे,सिद्धेश्वर बुंधे यांनी सुद्धा आपले विचार व्यक्त केले.कार्यकमाच्या यशस्वीतेसाठी सिंधू झिने, लंका जाधव,माया जाधव, सुनिता जाधव,कुसुम जाधव,कडुबा जाधव, डिगाबंर जाधव,मधुकर अंभोरे,पंढरी टेकाळे,श्याम बुंधे,सुभाष बुंधे,दिनकर बुंधे,गजानन बुंधे,गजानन भगत, देविदास बुंधे यांनी विशेष योगदान दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तथा आभार शाहीर उत्तम जाधव यांनी मानले. कार्यक्रमास बहुसंख्येने स्थानिक महिला पुरुष लोककलावंत, गावकरी उपस्थित होते.

## मलकापूरचे सिंगापूर होईल का.? असा प्रश्न जनसामान्यांकडून विचारला जात आहे



मलकापूर :- ( तालुका प्रतिनिधी ) बुलडाणा जिल्ह्यातील २१ मलकापूर विधानसभा मतदारसंघांमध्ये तब्बल सहाव्यांदा भाजपचे आमदार चैनसुख संचेती हे निवडून आलेले आहे. मात्र मलकापूर विधानसभा मतदारसंघाची परिस्थिती जैसे थे पाहायला मिळत आहे गेल्या ३० वर्षापासून एक हाती सत्ता गाजवणारे आमदार चैनसुख संचेती यांनी मलकापूर विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना फक्त हातावरती लड्डू देऊन खोटे आश्वासने दिली आहेत मागील २५ वर्षांपासून एकहाती सत्ता गाजवणाऱ्या संचेती यांनी पाहिजे तसा मलकापूर विधानसभा मतदारसंघाचा विकास केलेला नाही, चैनसुख संचिती हे आता सहाव्यांदा जरी निवडून आले असेल तरी आता तरी मलकापूरचे सिंगापूर होईल का.? असा प्रश्न जनसामान्यांकडून विचारला जात आहे. मलकापूर २१ विधानसभा मतदारसंघांमध्ये गेल्या ३० वर्षांपासून एक हाती सत्ता गाजवणारे भाजपचे आमदार चैनसुख संचेती यांनी मलकापूरचा चेहरा मोहरा बदलण्याचे कित्येकदा मतदारांना आश्वासन दिले मात्र ते आश्वासन अद्यापही फक्तोल ठरले आहे एवढेच नव्हे तर मलकापूरचे सिंगापूर बनवण्याची आश्वासनेही भाजप आमदार संचेती यांनी मतदार संघातील जनतेला दिले होते मात्र मलकापूरचे सिंगापूरच नाही तर बुलडाणा शहरासारखे सयीण तरी होईल व का.? असा प्रश्न देखील मतदार संचेती यांना विचारत आहे. अलीकडील काळात छोटी छोटी शहरे देखील विकासाकडे आगेकूच करत असताना महामार्ग , रेल्वे अशी उत्तम कनेक्टीव्हीटी असून देखील आजही विकासात्मकदुष्ट्या मलकापूर शहर अप्रगत का ? असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडला आहे. लोकप्रतिनिधी जागेद होतील तो सुदीन .बुलडाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी गेल्या पाच वर्षीमध्ये बुलडाण्याचा चेहरा मो-हराच बदला नाही तर बुलडाण्याचे खरोखर सिंगापूर बनवण्याची चित्र दिसत आहे, मागील पाच वर्षाच्या कालावधी मधील अडीच वर्षाचा कालावधी हा कोरोना सारख्या महामारीत गेला असला तरी उर्वरित फक्त अडीच वर्षीमध्ये बुलडाणा जिल्ह्याचा कायापालट आमदार गायकवाड यांनी केला आहे, एवढेच नव्हे तर महाराष्ट्रातून एकमेव निधी आणणारे आमदार म्हणून संजय गायकवाड यांची ओळख आहे महाराष्ट्राला हेवा वाटावा, असा बुलडाणा आमदार संजय गायकवाड यांनी उभा केलेला आहे, मात्र तीस वर्षांपासून एक हाती सत्ता गाजवणारे भाजपचे आमदार चैनसुख संचेती यांना हे गेल्या तीस वर्षातही जमले नाही हे विशेष, म्हणून आता मलकापूरच्या सिंगापूर नाहीतर बुलडाण्यासारखे सौंदर्यो करण तरी होईल का.? असा प्रश्न मतदारांना पडला आहे.

## इ १० वी व १२ वी विद्यार्थ्यांचे ग्रेस गुण अर्ज आपले सरकार पोर्टलवरच ऑनलाईन स्विकारले जाणार

बुलडाणा, इ. १० वी व १२ वी विद्यार्थ्यांचे ग्रेस गुण अर्ज शासनाच्या आपले सरकार प्रणालीद्वारे केवळ ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्याबाबत क्रीडा आयुक्त सुचित केले आहे. जिल्ह्यातील सर्व खेळाडू, विद्यार्थी, माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी आपले सरकार पोर्टलवर या वर्षीपासून सवलत गुणांचा अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस.महानकर यांनी केले आहे.दरवर्षीप्रमाणे इयत्ता १० वी व १२ वी च्या खेळाडू विद्यार्थ्यांचे ऑफ्फलाईन अर्ज मागविले जातात. त्या माहितीचे संकलन करुन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाद्वारे परिपुर्ण प्रस्ताव माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळास पाठविले जातात.सन २०२३-२४ पर्यंतची ग्रेस गुण प्रक्रिया काही मानवी उणीवांमुळे हे काम अचुक व दो-षरहीत होणे क्लिष्ट होत होती व त्याचा फ्फटका विद्यार्थ्यांना त्यांच्या गुण न मिळण्याने बसत होता. या प्रश्नावर तोडगा आणि सदर सवलत गुण प्रक्रिया निर्दोष करण्यासाठी, या वर्षीपासून म्हणजेच २०२४-२५ यावर्षापासून ग्रेस गुणांसाठी केली जाणारी प्रक्रिया शासनाच्या आपले सरकार पोर्टलद्वारे ऑनलाईन करण्यात आली आहे. तसेच सदर पोर्टलद्वारे सर्व अर्ज ऑनलाईन प्रणालीद्वारेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्याकडे सादर करण्याची सुविधा निर्माण करुन देण्यात आली आहे.त्याअनुषंगाने बुलढाणा जिल्ह्यातील सर्व खेळाडू विद्यार्थी / जिल्ह्यातील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांनी आपले सरकार ॲपद्वारे या वर्षीपासून सवलत गुणांचा अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे. त्यासंदर्भात कोणताही खेळाडू जिल्हा क्रीडा कार्यालय, बुलढाणा येथे ऑफ्फलाईन पद्धतीने अर्ज सादर करणार नाही व अशा प्रकारचा अर्ज जिल्हा क्रीडा कार्यालय, बुलढाणा यांचेकडून स्विकारल्या जाणार नाही याची नोंद बुलढाणा जिल्ह्यातील सर्व खेळाडू, विद्यार्थी, माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी घ्यावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस.महानकर यांनी केले आहे.